# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 18 May 2024

Time: 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १८ मे २०२४ दुपारी १.०० वा.**

****

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात येत्या सोमवारी २० मे रोजी मतदान होणार आहे. यामध्ये राज्यातल्या उत्तर मुंबई, उत्तर मध्य मुंबई, दक्षिण मुंबई, दक्षिण मध्य मुंबई, वायव्य मुंबई, ईशान्य मुंबई, धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण आणि ठाणे या १३ मतदारसंघांचा समावेश असून, याठिकाणचा प्रचार आज संपत आहे.

या टप्प्यातल्या मतदानासाठी २४ हजार ५७९ मतदान केंद्र तयार करण्यात आले आहेत. राज्यातल्या १३ मतदारसंघांत दोन कोटी ४६ लाख ६९ हजार ५४४ मतदार, आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत, तर २६४ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

****

आज प्रचाराचा शेवटचा दिवस असल्यानं सर्वच राजकीय पक्षांचे नेते सभा, बैठका, रोड शो च्या माध्यमातून जोरदार प्रचार करत आहेत.

नाशिक लोकसभा मतदारसंघातले महाविकास आघाडीचे उमेदवार राजाभाऊ वाजे यांच्या प्रचारासाठी युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी काल नाशिक शहरात सभा घेतली. महाराष्ट्रात येणारे उद्योग हे गुजरात राज्यात पळवण्यात आले, अशी टीका त्यांनी यावेळी केली.

****

नाशिक जिल्ह्यात मालेगाव इथं आज उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची सभा होणार आहे.

ठाणे इथं आज महाविकास आघाडी आणि महायुतीच्या उमेदवारांकडून मोटार बाईक तसंच पायी प्रचाराच्या रॅली काढल्या जाणार आहेत. ठाणे लोकसभा मतदारसंघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नरेश म्हस्के यांच्या, तर आमदार आदित्य

ठाकरे हे राजन विचारे यांच्यासाठी बाइक रॅली काढणार आहेत. भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील आज ठाणे इथं सभा होणार आहे.

****

महाविकास आघाडीतल्या घटक पक्षांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेतली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे या पत्रकार परिषदेला उपस्थित होते. राज्यातल्या ४८ पैकी सुमारे ४६ जागा महाविकास आघाडीला मिळतील, असा विश्वास, खरगे यांनी यावेळी व्यक्त केला. ही निवडणूक जनतेची असून, जनता ती लढत असल्याचं ते म्हणाले. आम्ही सत्तेत आल्यावर महाराष्ट्राचं वैभव परत आणू, असं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. तर शरद पवार यांनी, विविध मुद्यांवरुन मोदी सरकारवर टीका केली.

****

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे लोक वैफल्यग्रस्त झाल्याची टीका, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत केली. अनिल देशमुखांना भाजपनं मंत्रीपद देण्यास नकार दिल्यानं ते तिथं राहिले असल्याचंही त्यांनी सांगितलं. तटकरे यांनी नाशिक, पालघर मतदार संघातल्या राष्ट्रवादीचे प्रमुख नेते आणि विधानसभा सदस्यांबरोबर बैठका घेऊन संवाद साधला.

****

सोलापूर जिल्ह्यातल्या एक हजार १४७ गावात दुष्काळ जाहिर करण्यात आला आहे. त्यानुसार राज्यशासनाने शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळावा यासाठी दुष्काळी उपाय योजनेतून थकीत विज बिलात ३३ पूर्णांक पाच टक्के सुट देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यतल्या दोन लाख ७४ हजार ४७९ शेतकऱ्यांना, ८६ कोटी १६ लाख ६६ हजार रुपयांची सुट देण्यात आली आहे.

****

थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीत भारताच्या सात्विक साईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीचा उपान्त्य फेरीचा सामना कोरियाच्या जोडीशी सध्या सरु आहे. सात्विक चिराग जोडीनं काल मलेशियाच्या जोडीचा पराभव करत उपान्त्य फेरीत प्रवेश केला होता. तर महिला दुहेरीत अश्विनी पोनप्पा आणि तनिषा क्रास्टो यांचा उपान्त्य फेरीतला सामना आज थायलंडच्या जोडीशी आज होणार आहे.

****

जागतिक टेबलटेनिस फीडर स्पर्धेत भारतीय जोडी पोयमंती बैसया आणि आकाश यांनी मिश्र दुहेरीचं विजेतेपद पटकावलं आहे. त्यांनी स्वदेशी जोडी अनिर्बन घोष आणि स्वस्तिका घोष यांच्यावर चुरशीच्या लढतीत तीन – दोन असा विजय मिळवला.

****

उन्हाळी सुट्यात होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेवून दक्षिण मध्य रेल्वेनं नांदेड–हडपसर–नांदेड विशेष गाडीच्या १२ फेऱ्या मंजूर केल्या आहेत. नांदेड–हडपसर साप्ताहिक विशेष गाडी २२ मे ते २६ जून पर्यंत दर बुधवारी नांदेड इथून रात्री नऊ वाजता सुटेल आणि पूर्णा, परभणी, औरंगाबाद, मनमाड, अहमदनगर, दौंड मार्गे हडपसर इथं दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजून २० मिनिटांनी पोहोचेल.

परतीच्या प्रवासात ही गाडी २३ मे ते २७ जून पर्यंत दर गुरुवारी हडपसर इथून दुपारी सव्वा तीन वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी साडे चार वाजता नांदेडला पोहोचेल.

****

मराठवाड्यात नांदेड, लातूर, धाराशिव, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यात पुढचे पाच दिवस वादळी वारा, मेघगर्जना तसंच विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. आजपासून विभागाच्या तापमानातही तीन ते चार अंश सेल्सियसने वाढ होण्याची शक्यता असल्याचं, परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या हवामान विभागाने कळवलं आहे.

****